**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/५४/२०२४

दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. इंदू सुनिल राजभोग

२. सुनंदा शिवाजी साळे

दोघी रा.विठ्ठल नगर,जत ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. आनंदा संजय चव्हाण

२. कोमल संजय कांबळे

अ.क्र.१ रा. विठ्ठलनगर,जत ता. जत, जि.सांगली

अ.क्र.२ रा.आलेगाव ता.सांगोला जि.सोलापूर ...... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र.**

मौजे कुणिकोणूर ता.जत येथील गट नंबर ६९१ संदर्भात तहसिलदार,जत यांनी क्र.हनो/एसआर/७५७/२०१६ दिनांक १७.०४.२०१६ रोजी दिलेला वाटप आदेश व सदर वाटप आदेशाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी माडग्याळ यांनी फेरफार क्रमांक १५०४ ची नोंद मंजूर करणेच्या निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे कुणिकोणूर ता.जत येथील गट नंबर ६९१ संदर्भात तहसिलदार,जत यांनी क्र.हनो/एसआर/७५७/२०१६ दिनांक १७.०४.२०१६ रोजी दिलेला वाटप आदेश व सदर वाटप आदेशाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी माडग्याळ यांनी फेरफार क्रमांक १५०४ ची नोंद मंजूर करणेच्या निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेला अपील मेमो व त्यासोबत दाखल कागदपत्र यांचे एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी हे वाद मिळकत वडिलोपार्जीत आहे, त्यांचा हक्क आहे, तसेच सदर मिळकतीचे सर्व कायदेशीर हिस्सेदारांमध्ये कायदेशीर पध्दतीने वाटप झालेले नाही, बोगस वाटपपत्र करून घेतलेअसलेबाबतचा मुद्दा उपस्थित करून झालेले वाटप आदेश रद्द करणेकामी, जवळपास ०७ वर्षे ०८ महिने इतक्या विलंबाने अपील दाखल केलेचे दिसून येत आहे. मुलत: अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अवलोकन करता या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेरील म्हणजेच दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातील मुद्दे उपस्थित करून झालेले वाटणीपत्र रद्द करणेची विनंती करीत आहेत. मुलत: अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने याबाबत जरूर तर सक्षम दिवाणी न्यायालयामध्ये याबाबत दाद मागणे क्रमप्राप्त होणार आहे.

३. सबब, अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील दाखल करणेकामी इतका का विलंब झालेला आहे. याबाबत कोणताही कायदेशीर ऊहापोह अथवा कागदोपत्री पुरावा माझे-समोर आणीत नाहीत. त्याचबरोबर मा.सर्वोच्च न्यायालयाकडील देणेत आलेल्या वेगवेगळया आदेश प्रकरणी प्रत्येक दिवसागणीक विलंबाबातची कारणे पुराव्यानिशी नमूद करणे क्रमप्राप्त असताना अशी कोणतीही बाब कारण-मिमांसासहीत माझे निदर्शनास आणत नाहीत. त्यामुळे वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थीती व दाखल कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांचे दाखल अपील हे कायदेशीरदृष्ट्या या

न्यायालयात टिकणार नसलेचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचा प्रस्तुत अपील अर्ज हा विलंब माफीच्या मुद्दयावरच फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचा अपील अर्ज विलंब माफीच्या मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणेतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

**(अजयकुमार नष्टे)**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत - अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.